Read India
An Imprint of Pratham Books

# चांदोबाची टोपी



लेखिका : नोनी
चित्रांकन : अँजी
आणि उपेश

Original Story (English) The Moon and The Cap by Noni
© Pratham Books, 2007

First Marathi Edition 2007

Illustrations: Angie & Upesh
Marathi Translation: Dr. Utkarsha Manish

ISBN : 978-81-8263-891-4

Registered Office:
PRATHAM BOOKS
No.633/634, 4th "C" Main,
6th 'B' Cross, OMBR Layout, Banaswadi,
Bangalore- 560043.
Phone: 080 25429726/27/28

Regional Offices:
Mumbai ✆ 022 - 65162526
New Delhi ✆ 011 - 65684113

Typsetting and Layout by:
Athena Productions

Printed by:
Penta Plus, Bangalore

Published by:
Pratham Books
www.prathambooks.org

*All rights reserved. No part of this publication may be reproduced or distributed in any form or by any means, or stored in a database or retrieval system, without the prior written permission of the publisher.*

# चांदोबाची टोपी

लेखिका : नोनी
चित्रांकन : अँजी आणि उपेश
अनुवाद : डॉ. उत्कर्षा मनिष

आम्ही सारे दसऱ्याच्या जत्रेला गेलो.



बाबांनी चिंटूसाठी रंगीत चष्मा आणला. आईने माझ्यासाठी निळी टोपी आणली. बाळाला मिळाली साखरेची गोळी.



घरी जाताना जोरात वारा सुटला.
माझी टोपी उडून गेली.



माझी टोपी पिंपळाच्या झाडाच्या फांदीवर अडकली.



मी खूप रडलो. रात्री जेवलोही नाही.



नंतर रात्री चांदोबा वर आला. त्याने पिंपळाच्या झाडावरच्या माझ्या टोपीकडे पाहिले.



त्याने टोपी घालून पाहिली. चांदोबा हसला. मलाही हसावे लागले.



दुसऱ्या दिवशी शाळा सुटल्यावर आईने मला चमकदार लाल टोपी दिली. “चांदोबाने पाठवली,” ती म्हणाली.




त्या दिवशी रात्री, मी आणि चांदोबानी, दोघांनी आपआपल्या टोप्या घातल्या आणि हसलो. दोघे खूश झालो.



आता सूर्यालाही टोपी हवी असेल तर...?



आज मी कोणती टोपी घातली आहे?





नमस्कार, माझं नाव सोनम सोनकर. मी आठवीत शिकते आणि अभियंता होण्याचे स्वप्न पाहते. मला कत्थक नृत्य आवडते आणि सुंदर कपडेही!
तुम्ही हे पुस्तक विकत घेतल्याबद्दल मी तुमची आभारी आहे. यामुळे माझ्या वाचनालयाला माझ्यासाठी आणि माझ्या मित्रमैत्रिणींसाठी नवीन पुस्तके घेता येतील.

❋

नोनी हे बंगळूर येथे राहणाऱ्या लेखिकेचे टोपण नाव आहे. त्या शिक्षणक्षेत्रात कार्यरत आहेत.

❋

ॲंजी ह्या ग्राफीक डिझाईनर असून, त्या त्यांच्या फावल्या वेळात सिरॅमिकचे काम करतात.
उपेश हे ॲनिमेटर आहेत, जे ग्राफीक कादंबऱ्या जमा करतात आणि फावल्या वेळात जुने चित्रपट पाहतात.
दोघांनी मिळून, 'दि अदर डिझाईन स्टूडिओ' काढला आहे.

तुम्हाला उन्हात टोपी घालायला आवडते का?
कोणा कोणाला टोपी घालायला आवडते हे ह्या पुस्तकात वाचा.

आमच्या वेगवेगळ्या भाषांतील शीर्षकांच्या माहितीसाठी
www.prathambooks.org ला लॉग ऑन करा.

आमची पुस्तके इंग्रजी, हिंदी, मराठी, कानडी, गुजराती, बंगाली, तामिळ,
तेलुगु, पंजाबी, उर्दू आणि ओरिया या भाषांमध्ये मिळतात.

PRATHAM BOOKS

**प्रथम बुक्स** ना-नफा प्रकाशक आहेत जे उत्तम दर्जाची आणि
स्वस्त दरात भारतातील विविध भाषांमध्ये लहान मुलांसाठी पुस्तके काढतात.

Age Group: 3-6 years
Chandobachi Topee (Marathi)
MRP: Rs. 15.00

ISBN 978-81-8263-891-4